# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

**बांधकाम / विद्युत विभाग**

जा.क्र. मनपा/साबां/वि/उअ-२/३२७/2025-26
दि. २३/ ०७ /2025

प्रति,
1) **जनसंपर्क अधिकारी**
जनसंपर्क विभाग
2) **सिस्टीम मॅनेजर**
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :-** वृत्तपत्रात प्रेस नोट प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील रस्त्याच्या दुरुस्तीबाबतची प्रेस नोट यासोबत देण्यात येत असुन सदर प्रेस नोट महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर व वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात यावी.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-14/25-26/NM/L-91

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // प्रेस नोट //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावरील खड्ड्याबाबत दि.11/07/2025 रोजीच्या दै. हमारा महानगर व दि.14/07/2025 रोजीच्या दै. लोकमत या वृत्तपत्रात प्रसिद्ध बातमीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) यांचेमार्फत व महानगरपालिकेमार्फत विविध ठिकाणी सिमेंट कॉक्रीट रस्त्याची कामे करणेत आहेत. सदर सिमेंट कॉक्रीट रस्त्याची कामे करणेसाठी कांही ठिकाणी रस्ते खोदलेले आहेत. तसेच शहरामध्ये विविध भागात जलवाहिन्या अंथरण्याच्या कामासह मलवाहिनी अंथरणेची कामे सुरु असून त्याठिकाणी वाहतूक सुरळीत होणेच्या दृष्टीकोनातून तसेच सुरक्षेच्या दृष्टीकोनातून आवश्यक उपाय योजना करणेबाबत संबधित ठेकेदारास नोटीस बजावणेत आलेल्या आहेत.

तसेच शहरामध्ये विविध सेवा वाहिन्यांनी खोदलेले रस्ते, पावसाळ्यात पडणारे खड्डे वार्षिक मुदतीने दुरुस्ती करणेसाठी तीन ठेकेदारांना कार्यादेश देण्यात आलेले असून त्यांचेमार्फत रस्ते दुरुस्तीचे कामे करुन घेण्यात येत आहेत. फाऊंटन हॉटेल ते दहिसर चेक नाका हा महामार्ग राष्ट्रीय महामार्ग क्र.08 यांच्या ताब्यात आहे. सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत वेळोवेळी संबंधित प्राधिकरणास कळविण्यात आलेले आहे. तसेच दहिसर चेक नाका ते भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदान येथे एम.एम.आर.डी.ए. मार्फत मेट्रो-9 चे काम सुरु असुन सदरील प्राधिकरणास सुध्दा वेळोवेळी रस्ते दुरुस्तीबाबत कळविण्यात आलेले आहे व त्याप्रमाणे पाठपुरावा करणेत येत असून शहरातील रस्त्याची दुरुस्ती करणेत येत आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-14/25-26/NVL-91